संक्षिप्त फौ. ख. क्र. ३१८/२०२३
सरकार -वि.- संगीता राऊत
नि.क्र. ६ खाली.

सरकार तर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी

मी याव्दारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की,

माझे नाव - किर्तीधर लक्ष्मण कामडी,
वय ५५ वर्षे, व्यवसाय – खाजगी,
राहणार – उमरेड ता. उमरेड, जि. नागपूर.

**<u>सरतपासणी-सहायक सरकारी अभियोक्ता श्री एस.एस.मोरे यांचे मार्फत</u>**

१. मी आरोपीला ओळखत नाही. दिनांक १८.०१.२०२३ रोजी राज्य उत्पादन शुल्क अधिकारी मला कोठेही बोलाविले नव्हते. मी जात असताना राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी माझी सही घेतली. आता मला सुचनापत्र व घटनास्थळ वजा जप्ती पंचनामा दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहित नाही. घटनास्थळ वजा जप्ती पंचनाम्यावरील सहीला **नि.क्र.८** देण्यात येते. आता मला जप्ती पत्रक दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर मला माहीत नाही. जप्ती पत्रकावरील सहीला **नि.क्र.९** देण्यात येते.

सरतपास संपला.

**सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलट तपासात विचारण्याजोगे प्रश्न विचारण्यास परवानगी मागितली. परवानगी देण्यात आली. उलट तपास - सरकार तर्फे**

२. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १८.०१.२०२३ रोजी राज्य उत्पादन शुल्क अधिकारी यांनी मला वार्ड क्र.१ कारगाव ता. भिवापूर येथे

आरोपीच्या घरी पंचनाम्याकरीता बोलाविले होते. हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादन शुल्क अधिकारी यांनी माझे समक्ष आरोपीच्या ताब्यातुन ३५ देशी दारुच्या निपा, तीन काचेचे ग्लासए २ प्लास्टीक मग्गा व एक माठ जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, राज्य उत्पादन शुल्क अधिकाऱ्यांनी मला पंचनामा वाचून दाखविला व त्यानंतर माझी सही घेतली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलट तपास आरोपी तर्फे त्यांचे वकील श्रीमती हुडकन यांचे मार्फत**

३. नाकारला.

उलट तपास संपला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,
माझे समक्ष,

दिनांक १३.०६.२०२५

स्वा/-
(एस. जे. लाड)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
भिवापूर.